# श्री ह.व्या.प्र.मंडळ द्वारा संचालित डिग्री कॉलेज ऑफ फिजीकल एज्युकेशन मध्ये भव्य निबंध स्पर्धा संपन्न

## 2500 विद्यार्थ्यांचा सहभाग

अमरावतीः– श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ द्वारा संचालित डिग्री कॉलेज ऑफ फिजीकल एज्युकेशन द्वारा भव्य निबंध स्पर्धा मंगळवार दि. 21 जानेवारी 2020 रोजी ह.व्या.प्र.मंडळ येथील प्रेरणा स्थळ येथे घेण्यात आली. निबंध स्पर्धेची सुरुवात सायंकाळी 4 वाजता संस्थेचे प्रधान सचिव प्रभाकरराव वैद्य यांच्या हस्ते बजर दाबून करण्यात आले.

या निबंध स्पर्धेमध्ये डिसीपीईचे बी.पी.ई.एस, बी.पी.एड, एम.पी.एड., बी.ए.,एम.ए. योगा, डी.वाय.एड., बी.व्होक., बी.एस.सी.,बी.बी.ए., बी.सी.ए., एम.एस.सी., एम.सी.ए. आदि कोर्सेच्या 2500 विद्यार्थ्यांनी निबंध स्पर्धेत सहभाग घेतला होता. निबंध स्पर्धेचे विषय 13 असून याप्रकारे होते जल प्रौद्योगिकी और इंजीनियरिंग, नागरिकता संशोधन अधिनियम, पर्यावरण विकास, स्पोर्ट डाईट सामान्य आहार, ईंधन के रूप में पानी, स्वास्थ्यकारी परिस्थिती की प्रणालियों की जागरूकता, संस्कृति फैशन, महिलाओं के लिए आत्मरक्षा, नई शिक्षा नीति, भारत में प्रदूषण, जल संसाधनों का विकास, सौर ऊर्जा ( आज की आवश्यकता), शिक्षा में अनुसंधान की आवश्यकता हे होते. या स्पर्धेचे प्रथम, द्वितीय, तृतीय तसेच 9 प्रोत्साहनपर बक्षीस दि. 26 जानेवारी 2019 रोजी देण्यात येणार आहे.

या स्पर्धेमध्ये डिसीपीईचे प्राचार्य डॉ.के.के. देबनाथ, संस्थेच्या सचिव डॉ.माधुरीताई चेंडके, डॉ. श्रीनिवास देशपांडे, डॉ. सुर्यकांत पाटील, प्रा. चेंडके, प्रा. बाबर अली खॉ, डॉ. उपाध्याय, डॉ. लक्ष्मीकांत खंडागळे, डॉ. संजय तिरथकर, प्रा. निर्मळ, प्रा. मधुकर बुरनासे आदिंच्या मार्गदर्शनाखाली स्पर्धा घेण्यात आली. तसेच सर्व विभागाचे विभाग प्रमुख व सर्व प्राध्यापकगण यांनी स्पर्धेकरीता अनमोल सहकार्य केले.

---------------------------------------------